☆

|| श्री गणेश प्रसन्न ||

# ११ विवाह – गुण – मेलन पद्धति

विवाह जमविताना फक्त गुण संख्या १८ पेक्षा जास्त असली अथवा २८ , ३० , ३२ गुण जमले म्हणजे विवाह – सोहळा सुखकारक होतोच असे नाही. कित्येक वेळा गुण संख्या ३० अगर ३० च्या वर जमून सुद्धा विवाहोत्तर अडचणी येऊन विवाह सुखात वैगुण्य येते. वास्तविक ज्योतिष शास्त्र तसं बघायला गेलं तर फारच क्लिष्ट आहे. त्यातून ज्योतिष भविष्य कथन करणारा तितकाच वाचासिद्धि असलेला हवा म्हणूनच आम्ही ज्योतिष कथन करणारे ज्योतिष दररोज २१ वेळा गणपति – अथर्वशिर्ष म्हणून ज्योतिष कथनात सुरूवात करतो. असो.

हल्लींच्या धकाधकीच्या जीवनात व वधु – वर उच्च शिक्षित असून सुद्धा त्यांचे पालक व स्वतः वधु – वर आपापल्या पत्रिका ज्योतिषाला दाखवून गुण – मेलन करवून घेतात. पण प्रत्येक वेळेला ज्योतिषी आपल्या हाकेवर असेलच असं नाही. ह्या साठी तुम्हा पालक मंडळींना ज्योतिषांची मनधारणी करावी लागते. जसे आपल्या मुलाचे /मुलीचे साधारण डोके दुखत असेल तर तुम्ही लगेच डॉक्टरकडे धाव घेत नाही. घरात क्रोसीन अथवा तत्सम गोळी घेऊन तात्पुरता ईलाज करून घेता. तसेच ज्योतिषाकडे लगेच धाव न घेता तुम्ही स्वतः आपल्या पाल्याच्या पत्रिकेचे गुण मेलन का बरे करू नये ? हाच उद्येश लक्षात घेऊन मी एक ज्योतिषी ह्या नात्याने तुम्हा सर्व पालकांना वधु – वरांना जुजबी गुण – मेलनाचे शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभं करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहे.

<u>वधु – वरांची पत्रिकेत पुढील गोष्टी तपासाव्या लागतात जसे.</u>

१ ) राशी – मैत्री २ ) ग्रह मैत्री ३ ) नक्षत्र मैत्री ४ ) गण ५ ) नाडी ६ ) योनी
७ ) मुलीच्या कुंडलीत रवि – मंगळ व शुक्र ग्रह सुस्थितित असावे तर मुलाच्या कुंडलीत चंद्र -शुक्र व सप्रमेश म्हणजेच विवाह सुखाचा कारक ग्रह सुस्थितित असावा.
८ ) मुलाला / मुलीला मंगळ तर नाही ना ?
९ ) विवाह स्थान म्हणजेच सप्त्रम स्थान " पापकर्तरी " योगात तर नाही ना ?
१०) विवाह सुखाच्या कारक ग्रहावर म्हणजेच सप्त्रमेषावर पाप ग्रहाची दृष्टी तर नाही ना ?
११ ) विवाह सुखाचा कारक ग्रह " शुक्र " " पापकर्तरी " योगात अथवा पाप ग्रह दृष्ट तर नाही ना ? तसेच मूळ कुंडलीत जर शुक्र कन्या या नीच राशीत असता विवाह सुख चांगले मिळत नाही.
१२ ) विवाहोत्तर पापग्रहाची महादशा अथवा कुंडलीत ६ – ८ – १२ ह्या स्थानी असणा–या राशी – स्वामीची महादशा तर नाही ना ? येथे एक गोष्ट सांगाविशी वाटते की मूळ कुंडलीत ६ – ८ – १२ ही अशूभ स्थाने ज्योतिष शास्त्रात गृहित धरली आहेत. ह्या स्थानांचे स्वामी पण ते कुणीहि असोत( चंद्र - गुरू - शुक्रासारखे शुभ ग्रह असोत) ते ग्रह त्यांच्या महादशेत चांगली फळे देत नाहीत.
१३ ) सप्त्रमेष– विवाह सुखाचा कारक ग्रह ६ – ८ – १२ स्थानी असता जोडीदारापासून विवाह सुखाच्या अपेक्षा करू नये.
१४ ) ६ – ७ – ८ ह्या स्थानी जास्तीत जास्त पापग्रह नसावेत.

अशा कितीतरी गोष्टी पाहून मगच पत्रिकेचे गुण मेलन करावे अन्यथा १८ पेक्षा जास्त गुण जमून सुद्धा पुढे वैवाहिक जीवनात काही विपरीत घडण्याची शक्यता आहे. अरे हो ऽऽ हो – थांबा वरील सर्व गोष्टी तुमच्या डोक्यावरून गेल्या ना ? म हणूनच तर मी तुम्हाला वरील प्रत्येक गोष्टीचे सहज – सोप्या भाषेत स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करीत आहे.

१ ) राशी मैत्री ः -

पुढे १२ राशी व त्यांचे स्वामी कोण कोण आहेत ते दिले आहे .
१ ) सिंह – रवि मालक २ ) कर्क - चंद्र मालक ३ ) मेष व वृश्चिक – मंगळ मालक ४) मिथून व कन्या – बुध मालक
५ ) धनु व मीन – गुरू मालक ६ ) वृषभ व तुला – शुक्र मालक ७ ) मकर व कुंभ – शनी मालक .

रवि व चंद्र यांना फक्त एकच राशी दिली आहे . बाकी मंगळ – बुध – गुरू - शुक्र – शनी ह्या सर्वांना दोन दोन राशींचे स्वामीत्व बहाल करण्यात आले आहे .

-- ः ग्रहांचे – शत्रूमित्रत्व ः --

| ग्रह | मित्र | शत्रू |
|---|---|---|
| रवि | चंद्र , मंगळ , गुरू | शनी – शुक्र |
| चंद्र | रवि – बुध | ह्याला शत्रु नाही |
| मंगळ | रवि , चंद्र , गुरू | बुध |
| बुध | रवि , शुक्र | चंद्र |
| गुरू | रवि , चंद्र , मंगळ | बुध , शुक्र |
| शनी | बुध – शुक्र | रवि , चंद्र , मंगळ |
| राहू | गुरू , शुक्र , शनी | रवि , चंद्र , मंगळ |
| केतू | रवि , चंद्र , मंगळ | शुक्र – शनी |

आता वरील तक्यातून वधु – वरांचे गुण – मेलन करताना जर वधुची रास सिंह – ( स्वामी रवि ) व वराची रास कुंभ ( स्वामी शनी ) तर ग्रह मैत्री_नसल्यामुळे ह्या दोघांचे एकमेकांशी पटणार नाही व पुढे वैवाहिक जीवनात ताण – तणाव राहील . उदाहरण म्हणून वराची रास कुंभ व धनिष्ठा नक्षत्र व वधुची रास सिंह मघा नक्षत्र २३ .५ गुण जमून सुद्धा विवाह करू नका असा निर्णय दिला आहे .

पहा अशी अनेक उदाहरणे देता येतील तेव्हा तुम्हाला वधु – वर गुण मेलन करता येईल . ( टिप – पुढे गुण – मेलन करताना मी मुद्यामच वधुची रास सिंह व वराची रास कुंभ लिहून प्रत्यक्ष गुण मेलनाच्या निरनिराळया गोष्टी तपासताना तुम्ही त्या कसोटया कशा लावाव्यात ते लिहिण्याचा प्रयत्न करीत आहे . )

२) ग्रह – मैत्री ः - पुन्हा वधुची रास सिंह व वराची रास कुंभ . सिंह राशीचा स्वामी रवि व कुंभ राशीचा स्वामी शनी . वरील ग्रहांचे शत्रूमित्रत्व तत्वाचा उपयोग करून रविच्या शनी शत्रू म्हणून ग्रह मैत्री नसल्यामुळे वधु – वराचे जीवनात वैर निर्माण होऊन वैवाहिक जीवनात ताण – तणाव निर्माण होईल .

३ ) नक्षत्र मैत्री ः - जशी ग्रहमैत्री – राशी मैत्री असता वैवाहिक जीवन सुखकर जाते तसेच नक्षत्र मैत्री सुद्धा असावी लागते मग तुम्ही जर ज्योतिष शास्त्रात अनभिद्य !! तुम्हाला कशी समजणार नक्षत्र मैत्री ? घाबरू नका ! तुम्ही तुमच्या पाल्याची ( मुलगा / मुलगी ) कॉम्पीटर कुंडली करून घ्या व त्या कुंडलीत “ ताराचक्र ” म्हणून एक तक्ता आहे त्यात वरच्या बाजूला “ जन्म , संपत्ति , विपत – क्षेम , प्रत्यरी , साधक , वध , मैत्री , आघि– मैत्री व त्याखाली नक्षत्र दिलेली असतात . त्या तक्तावरून तुम्हाला नक्षत्रमैत्री कळू शकेल . )

४ ) गण ः - एकूण ३ गण आहेत . मनुष्य , देव , राक्षस गण .
देवगण – मनुष्य गण , अथवा राक्षस गण एकमेकांना चालु शकतो .
मनुष्य गण – राक्षस गण ः हे वैर दाखविले म्हणून विवाहाला त्याज्य ठरते .
एक गण म्हणजे मनुष्य – मनुष्य , देवगण – देवगण , राक्षसगण – राक्षसगण तर विवाहाला हरकत नाही .
पण गणांवरून माणसाचे स्वभाव विश्लेषण होऊ शकले .

देवगण - उदार , पापभिरू , दुस–यांचे चांगले चिंतणारा .
मनुष्य गण ः आपमतलनी , स्वार्थी , स्वतःचा स्वार्थ साधला की मग मान फिरवून निघून जातात .
राक्षस गण ः माझं ते माझं आणि तुझं तेहि माझच , कठोर अंतःकरणाचा , दुस–या विषयी दया–माया असत नाही .

५ ) नाडी ः - एक नाडी दोष असतां फलधारणा होत नाही . म्हणून एक नाडी दोष असतां विवाहाला ग्राह्य धरत नाही . पण ह्याला काहीच आधार नाही . एक नाडी दोष असतां फलधारणा होते पण जन्माला येणारे अपत्य काही तरी शारीरीक – मानसिक दोष घेऊन जन्म घेते . पण जर का वधु – वरांची " आद्य नाडी वा अंत नाडी " असतां फलधारणा होऊ शकते .
आता शारीरीक व मानसिक दोष म्हणजे काय ? तर शरीरातील कुठल्यातरी अवयवाची पूर्ण वाढ होत नाही . कान – डोळे – हात कुठेतरी बारीकसा दोष राहून जातो .
आता मानसिक दोष म्हणजे काय ? तर मेंदूची पूर्ण वाढ न झाल्याने अभ्यासात ते मूल यथातथाच असते . आकलन शक्ति कमी असते त्यामुळे शिक्षणात प्रगति होत नाही . करीयर मध्ये सुद्धा धडाडी दिसून येत नाही .
परंतु " उभयतांची – वधु – वरांची " मध्य नाडी असून जर एक नाड दोष असेल तर त्यांना एकमेकांपासून कधीहि फलधारणा होऊ शकत नाही . त्यामुळे जीवनात त्यांना अपत्य सुखासाठी एखादे मूल दत्तकच घ्यावे लागेल .

६ ) योनी ः - स्त्री / पुरूषांना एखाद्या जनावराप्रमाणे भर रस्त्यात कामवासना तृप्त करता येत नाही . त्यासाठी त्यांना विवाहबंधनात अडकून आपली कामवासना तृप्त करता येते आणि म्हणूनच ज्योतिष शास्त्रात " योनीची " वर्गवारी जनावरांची नावे देऊन त्या त्या योनीचा अर्थ सांगितला आहे . त्याला म्हणतात " योनी कुट " ह्यांना जनावरांचीच नावे दिली आहेत . जसे अश्र्व , मेष , सर्प , श्र्वान , मार्जार , मुषक , गो , महिषी , गज , व्याघ्र , मृग , वानर , नकुल व सिंह अशा १४ योनी आहेत .
म्हणून तुम्ही वधु – वरांचे गुण –मेलन करताना पुढील गोष्टी लक्षात ठेवाव्यात . गो – व्याघ्र , महिषी – अश्र्व , श्र्वान – मृग , मार्जार – मुबक , सिंह – गज , वानर – मेष , नकुल ( मुंगूस ) – सर्प अशा परस्पर वैर योनी असल्यास वैवाहिक सुखात म्हणजेच " सेक्स " सुखात अडचणी येऊन कधी – कधी घटस्फोटहि होऊ शकतो व कोर्ट त्याला संमति देते .

७ ) वधुच्या कुंडलीत रवि – मंगळ व शुक्र ग्रह सुस्थितित असावे लागतात . ( वरील ग्रह शुभ स्थितित आहेत किंवा नाही ते वर दिलेल्या तक्यातून तुम्ही पाहू शकतात . तर वराच्या कुंडलीत चंद्र - शुक्र व सप्त्मभवाचा कारक ग्रह सुस्थितित असावे लागतात . म्हणजे नुसते १८ किंवा त्यापेक्षा जास्त गुण असून वरील ग्रह स्थिति चांगली नसेल तर जास्त गुण जमून सुद्धा वैवाहिक जीवन सुखकारक होऊ शकत नाही .

८ ) मुलाला / मुलीला मंगळ दोष तर नाही ना ? आता मंगळ दोष म्हणजे सोबतची कुंडली पहा .

मंगळ दोष




मंगळ दोष धरीत नाही



लग्न स्थानात मेष राशीचा मंगळ असेल , चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीचा मंगळ , सप्तमस्थानी मकर राशीचा मंगळ , अष्टम स्थानी कर्क राशीचा मंगळ व व्ययस्थानी धनुराशीचा मंगळ असल्यास ती मंगळ कुंडली म्हणून गणली जात नाही .

आता मंगळ दोषामुळे काय होते ? तर विवाह विलंबाने होतो . विवाह सुखात अडचणी येतात . घरामध्ये तंटे , भांडण , अशांती वगैरे होऊन वैवाहिक सुख पूर्णपणे बिघडून कित्येकदा घटस्फोट – विभक्तपणा सुद्धा येऊ शकतो . आता मी तुम्हाला दुसरा " क्लु " देतो . पण तो तुम्ही लक्षात नाही ठेवला तरी चालेल . त्यासाठी तुम्हाला चांगला ज्योतिषच गाठला पाहिजे . वरील मंगळ दोष कुंडलीत जर रवि मंगळ ग्रहाबरोबर ८°अंशात ( युती ) असता मंगळ दोष नाहीसा होतो . तसेच जर मंगळ दोष असून त्या मंगळावर गुरू ग्रहांची शुक्र दृष्टी ( गुरूग्रहाला ३ शुभ दृष्टी असते . ५ वी ७ वी व ९ वी असेल तरीहि मंगळ दोष नाहीसा होतो . )

९ ) कुंडलितील सप्तमस्थानाला विवाह स्थान म्हणून संबोधितात ( कृपया सोबतची कुंडली पहा )




जर विवाह स्थानाचा पुढे व मागे - राहू – शनी , रवि व हर्षल , नेपचून असे पाप ग्रह असले . ( वधु – वराच्या कुंडलीत – अथवा एकटया वधुच्या / वराच्या कुंडलीत ) त्याला ज्योतिष शास्त्रात " पापकर्तरी " योग असे म्हणतात . इतर गुण चांगले असून सुद्धा जर विवाह स्थान पापकर्तरी योगात असता विवाह सुखात अडचणी येऊन विभक्तपणा सुद्धा येतो . म्हणूनच नुसते गुण – मेलन न करता वरील सर्व निकष लावून तुम्ही जर वधु – वरांचे गुणमेलन केले तरच विवाह सोहळा सुखाचा होईल .

मग सांगा बरं आम्हा ज्योतिषांना कितीतरी गोष्टी पाहाव्या लागतात . आहे कि नाही ज्योतिषशास्त्रच " क्लिस्ट " ?

गुण – मेलन बद्यल आणखी बरच काही सांगता येईल . पण तुम्ही सर्व " बोअर " व्हाल . म्हणून तूर्त तरी एव्हढी माहिती मला वाटतं पुरेशी आहे .

इति शुभम् भवतू !!